**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**
Email Id – jdhepune@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. शिससं/उशि/पुवि/पीएमएस/शिष्यवृत्ती/२०२०-२१/ 1700 दिनांक : २८.०८.२०२०

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कनिष्ठ / वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.

**विषय : - अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०२०-२१ च्या अंमलबजावणीबाबत..**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालनालयाचे ईमेलद्वारे प्राप्त पत्र क्र. उशिसं/शिष्यवृत्ती/पीएमएस/ २०२०-२१/५५५० दि. २७.०८.२०२०.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारशी व जैन या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकोत्तर (Post Matric) शिक्षणाकरीता १०० टक्के केंद्र शासन पुरस्कृत "अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०२०-२१" च्या नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व नुतनीकरणाचे (Renewal) फॉर्म ऑनलाईन पध्दतीने जमा करण्यासाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर मागविण्यात येत आहेत.

सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षामध्ये महाराष्ट्र राज्यासाठी नवीन (Fresh) शिष्यवृत्तीसाठी ४७५७५ संच निर्धारित केलेले आहेत. **केंद्रशासनामार्फत नवीन शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२० अशी निर्धारित करण्यात आलेली आहे.** पोस्ट मॅट्रिक अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीची सविस्तर माहिती, अर्ज करण्याची पध्दत, संकेतस्थळ, तसेच इतर अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीची सविस्तर माहिती, राज्यातील प्रमुख वृत्तपत्रांमधून जाहिरात देऊन त्यास प्रसिध्दी देण्यात येत आहे. तसेच सदर जाहिरात या मा. संचालनालयाच्या **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळावरसुध्दा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर संकेतस्थळावर केंद्रशासनाकडून प्राप्त झालेल्या Standard Operating Procedure (SOP), Guidelines, Frequently Asked Questions (FAQs) for Post Matric Scholarship for minorities तसेच वेळोवेळी प्राप्त झालेली इतर माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

मार्गदर्शक सूचना Guidelines व FAQs काळजीपूर्वक वाचून त्यानुसार सर्व महाविद्यालयांना आणि विद्यापीठांना कार्यवाही करण्याबाबत सूचित करण्यात येत आहे. तसेच सदर योजनेबाबतच्या केंद्रशासनाकडील नविन व सुधारित प्राप्त होणा-या सूचनांसाठी **www.scholarships.gov.in** आणि **www.dhepune.gov.in** व **www.jdhepune.info** या संकेतस्थळाचे अवलोकन महाविद्यालयांनी आणि विद्यापीठांनी तसेच विद्यार्थ्यांनी करण्यात याव्यात.

सदर मार्गदर्शक सूचनांनुसार (Guidelines) महाविद्यालय/विद्यापीठाच्या प्रमुखांनी त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भरलल्या अर्जात नमूद केलेला त्यांचा आधार क्रमांक त्यांच्या बँक खात्याशी लिंक केलेला असल्याची खात्री करण्यात यावी. आधार क्रमांक बँक खात्याशी लिंक केलेला नसेल तर लिंक करणेबाबत सर्व विद्यार्थ्यांना सूचना देण्यात याव्यात. विद्यार्थ्यांनी त्यांचे अर्ज भरताना त्यांचा आधार क्रमांक त्यांच्या ज्या बँक खात्याशी लिंक केलेला आहे त्याच बँक खात्याच्या क्रमांक अर्जात क्रमांक नमूद करण्याबाबत सर्व विद्यार्थ्यांना सूचना देण्यात याव्यात. एखाद्या विद्यार्थ्याकडे आधार कार्ड नसल्यास त्याऐवजी त्या विद्यार्थ्याने आधार नोंदणी आयडी स्लीप (आधार नोंदणी पावती क्रमांक) किंवा बँक खाते पासबुकाच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत किंवा पॅन कार्ड अथवा ड्रायव्हिंग लायसन्सची प्रत अथवा प्राचार्यांची सही व शिक्का असलेले विद्यार्थ्यांच्या ओळखीबाबतचे फोटोसह असलेले प्रमाणपत्र ईत्यादी यापैकी एका कागदपत्राची छायांकित प्रत सर्व कागदपत्रांसह जोडण्याबाबत विद्यार्थ्यांना सूचना द्याव्यात. शिष्यवृत्ती बँक खात्यावर विनाविलंब जमा करण्यासाठी विद्यार्थ्यांचे आधार कार्ड नोंदणी क्रमांक असणे अत्यावश्यक आहे हे विद्यार्थ्यांना सूचित करण्यात यावे.

महाविद्यालयांनी/ विद्यापीठांनी / संस्थांनी रु. ५०,०००/- पेक्षा कमी शिष्यवृत्ती रक्कम असलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जासोबतची कागदपत्रे काटेकोरपणे तपासून ऑनलाईन अर्जावर पुढील कार्यवाही करावी. सदर कागदपत्रे महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर जतन करुन ठेवावी व रु. ५०,०००/- पेक्षा जास्त शिष्यवृत्ती रक्कम असलेल्या अर्जासोबतची कागदपत्रे ऑनलाईन अर्जासोबत UPLOAD करणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांना मागील वर्षात नवीन मंजूरीसाठी शिष्यवृत्ती मंजूर झालेली/मिळालेली आहे त्या विद्यार्थ्यांनी नूतनीकरणाचा अर्ज भरण्याच्या सूचना महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात. महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन अर्जांची योग्य त्या आवश्यक कागदपत्रांसह असल्याबाबतची तपासणी करुन मंजूर केलेले पात्र अर्ज पुढील टप्प्यावर विनाविलंब ऑनलाईन फॉरवर्ड करावेत. अर्ज फॉरवर्ड करण्यासाठी अंतिम दिनांकाची वाट पाहू नये.

केंद्रशासनाने महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती सन २०२०-२१ ही योजना पुणे विभागांतर्गत जास्तीत जास्त कार्यक्षमरित्या राबविण्यासाठी सर्व महाविद्यालयांनी / विद्यापीठांनी आणि संस्थांनी योग्य ते उपक्रम आयोजित करावेत. सदर शिष्यवृत्तीचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घेतला याबाबतच्या कार्यवाहीचा

अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा. सदर शिष्यवृत्ती ११, १२ वी, पदवी व पदव्युत्तर डीग्री, तसेच पोस्ट मॅट्रिक डिप्लोमा व सर्टिफिकेट पदवी या अभ्यासक्रमासाठी देण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी इयत्ता १० वी व १२ वी ची परिक्षा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातून उत्तीर्ण तसेच पदवी व पदव्युत्तर परिक्षा मान्यताप्राप्त विद्यापीठातून दिलेला विद्यार्थी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी पात्र आहेत. याची कृपया सर्व विभागांनी/ विद्यालयांनी / महाविद्यालयांनी / विद्यापीठांनी/ संस्थांनी नोंद घ्यावी.

अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती सन २०२०-२१ ही योजना राज्यात यशस्वीपणे राबविण्यसाठी सर्व महाविद्यालय / शैक्षणिक संस्था यांचे प्राचार्य / विभागप्रमुख यांनी विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा, बैठका, शिबीर घेण्यात यावेत जेणेकरुन जास्तीत जास्त विद्यार्थी या शिष्यवृत्तीचा लाभ घेतील यासाठी प्रयत्न करावे. तसेच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीबाबतच्या ऑनलाईन अर्ज करण्यासाठी येणाऱ्या अडचणींचे निराकरण करावे. तसेच जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरावेत तसेच उपरोक्त सूचना विद्यालय /महाविद्यालय/संस्था/ विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही त्वरीत करण्यात यावी व त्याचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर योजनेसाठी एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित रहाणार नाही याची गांभीर्याने दक्षता घेण्यात यावी.

28/08/20.

(हरिविजय शिंदे)
प्रशासन अधिकारी (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे १

प्रति - १. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
३. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
४. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे
५. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
६. प्राचार्य, तंत्रनिकेतन व औद्योगिक प्रशिक्षण संस्था.
७. प्राचार्य, वैद्यकिय महाविद्यालये.
८. मा. शिक्षण उपसंचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, पुणे १.
९. मा. शिक्षण उपसंचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, नाशिक.
१०. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांना माहितीसाठी सादर.